# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.06.2024** **वार – गुरुवार**

---

**राज्याभिषेक-डेस्क**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्याचा साडे तीनशेवा वर्धापन दिन आज राज्यात सर्वत्र साजरा होत आहे. पुण्यातही यानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. विविध मान्यवरांनी छत्रपती शिवरायांना  अभिवादन केलं आहे; सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही आज शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला.

**वृक्षारोपण**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त केंद्रीय संचार ब्युरो आणि पुणे महानगरपालिकेच्या सहकार्यानं कर्वेनगरच्या आयएमईआरटी महाविद्‌लायात काल वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. पर्यावरण रक्षण ही कोणा एका व्यक्तीची जबाबदारी नसून प्रत्येकाला त्यासाठी हातभार लावावा लागणार आहे, असं मत पुणे महापालिका उपायुक्त संजय शिंदे यांनी यावेळी व्यक्त केलं. यावेळी उपस्थितांनी पर्यावरण रक्षण आणि स्वच्छतेची प्रतिज्ञा घेतली.

**ग्रीनइनोव्हेटिव्हक्लब**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्तानं पिंपरी चिंचवड महापालिकेनं पाच जून ते 12 जून या कालावधीत पर्यावरण सप्ताहाचं आयोजन केलं आहे. या अंतर्गत उद्यान विभागानं दहा हजार वृक्ष रोपट्यांचं वाटप केलं असून विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण उपक्रम हाती घेतला जाईल,

तसंच शहरात ठिकठिकाणी सायकल ट्रॅक तयार केले जात असल्याचं पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितलं.

पिंपरी चिंचवड विद्यापीठात ग्रीन इनोव्हेटिव्ह क्लबचं उद्घाटन आज करण्यात आलं. महाविद्यालय परिसरात आणि समाजात पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशानं याची स्थापना केल्याची माहिती कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी दिली.

<u>जलसंवर्धन दिंडी</u>

संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळयाच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागानं  राज्यस्तरीय जलसवंर्धन दिंडीचं आयोजन केलं आहे. स्वच्छ वारी - स्वस्थ वारी- निर्मल वारी - हरित वारी या उपक्रमांतर्गत येत्या २९ जून ते १७ जुलै दरम्यान संत श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर ही दिंडी आयोजित केली जाईल. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थांनी त्यासाठी येत्या १० जूनपर्यंत नोंदणी करावी, असं आवाहन विद्यापीठ प्रशासनानं केलं आहे.

<u>साहित्यदीप</u>

साहित्यदीप प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा यंदाचा 'साहित्यदीप जीवन गौरव' पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक आणि महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांना प्रदान करण्यात येणार आहे. मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राजा दीक्षित यांच्या हस्ते येत्या शनिवारी पुण्यात हा पुरस्कार प्रदान केला जाईल, असं प्रतिष्ठानच्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

<u>सांडपाणी</u>

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांमध्ये सांडपाणी व्यवस्थापनासाठी ५३० कोटी रुपयांचं कर्ज घेण्यात येणार आहे. जपान इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह एजन्सी अर्थात जायका कडून अल्पदराने कर्ज घेण्याचा प्रस्ताव समोर आला असून येत्या १० जून रोजी महापालिकेत या संदर्भात प्राथमिक बैठक होणार आहे.

**पाऊस**

पुण्याच्या विविध भागात सध्या जोरदार पाऊस होत असून सांडपाणी वाहून नेण्याच्या अपुऱ्या व्यवस्थेमुळं मोठ्या प्रमाणावर पाणी साचून राहत आहे. वाहतुकीला आणि स्थानिक नागरिकांनाही त्याचा फटका बसत आहे. पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बंद करून उभ्या राहिलेल्या बेकायदा इमारती या पावसामुळे उघड्या पडल्या आहेत. या इमारतींचा पाया ढासळण्याची भीती निर्माण झाली असून स्थानिक नागरिकांना घरं रिकामी करण्याच्या नोटिसा स्थानिक प्रशासनानं  बजावल्या आहेत. प्रामुख्यानं कात्रज आणि आंबेगाव पठार भागात अशा प्रकारे मोठ्या प्रमाणावर बांधकामं झाल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**कल्याणी नगर**

कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणातील अल्पवयीन मुलाला १२ जुनपर्यंत बालसुधारगृहात ठेवण्यात येणार आहे. या मुलाला पाच जूनपर्यंत बालसुधारगृहात ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता. त्यानुसार त्याला काल न्यायालयात हजर करण्यात आलं; त्यावेळी न्यायालयानं हे निर्देश दिले.
सीमा शुल्क विभागाने पुणे विमानतळावर केलेल्या कारवाईत दुबईहून आलेल्या विमानातुण एक किलोहून अधिक वजनाचं सोनं जप्त करण्यात आलं आहे.  या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

**क्रीडा**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या वतीने मुलींच्या कनिष्ठ गटाच्या आंतरजिल्हा फुटबॉल स्पर्धा पुण्यात सुरू आहेत. या स्पर्धेत ठाणे संघाने पुणे संघावर 1-0 अशा फरकाने मात करत अंतिम फेरी गाठली. त्यामुळे पुण्याचं अंतिम फेरीतील प्रवेशाचं स्वप्न भंगलं. तिसऱ्या क्रमांकासाठी पुण्याची लढत रायगडशी होईल. अंतिम फेरीत ठाण्यासमोर कोल्हापूरचं आव्हान आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर पावसाच्या मध्यम सरी बरसल्या. उद्याही दुपार नंतर ढगांच्या गडगडाटासह पावसाचा इशारा पुणे वेधशाळेनं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**